आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

३१ मे २०२६ -रवि वार

**<u>ठळक बातम्या</u>**

उष्णतेच्या लाटेत नागरिकांनी स्वतःची काळजी घ्यावी, असं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधून आवाहन

राष्ट्रीय ॲ थलेटिक्स स्पर्धेतल्या यशस्वी खेळाडूंशी साधला संवाद

देशाचे नवीन संरक्षण दल प्रमुख म्हणून जनरल एन.एस. राजा सुब्रमणी यांनी, तर ॲडमिरल कृष्णा स्वामिनाथन यांनी नौदल प्रमुख म्हणून स्वीकारला पदभार

परदेशी गुंतवणूकदारांनी मे महिन्यात भारतीय बाजारपेठेतून सुमारे ३२ हजार ९६३ कोटी रुपये काढून घेतले

आणि

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि गुजरात टायटन्स यांच्यात अंतिम लढत

**<><><><><>**

देशातल्या बहुतांश भागात उष्णता वाढली असल्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी स्वतःची काळजी घ्यावी, सतत पाणी पीत राहावे असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासियांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा एकशे चौतीसावा भाग होता. सध्याच्या वातावरणात गरज असेल तरच काळजी घेऊन घराबाहेर पडावं, असं आवाहनही त्यांनी केलं.

**होल्ड बाईट - NATIONAL MKB USHNATA**

उन्हाळ्याच्या हंगामाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी या काळात कोकण आणि गोव्यातल्या कोकम सरबत आणि सोलकढी अशा पेयांसह, देशभरात प्यायली जाणाऱ्या विविध हंगामी पेयांचा उल्लेखही केला. ही केवळ पेये नसून ती भारताच्या विविध प्रदेशांच्या परंपरांचा एक अविभाज्य भाग आहेत आणि त्यातून एक भारत श्रेष्ठ भारत ही भावनाही प्रतिबिंबित होते असं ते म्हणाले.

यानिमित्तानं त्यांनी उन्हाळ्याच्या हंगामात कोकणाच्या हापूससह देशभरात विविध ठिकाणी आढळणाऱ्या आंब्याच्या जातींचा उल्लेख केला. आंब्याचा हा प्रवास आता

गावाखेड्यातून जागतिक बाजारात पोहोचल्याचं म्हणत, आंबा उत्पादक शेतकऱ्यांची प्रशंसा त्यांनी केली. हे शेतकरी देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेसाठी विशेष आहेत असं ते म्हणाले.

आपल्या अलिकडच्याच नेदरलँड्स भेटीत चोला काळातील प्राचीन ताम्रपट भारताला परत करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. हे ताम्रपट परत मिळाल्याबद्दल देश तसेच परदेशातून लोक आनंद आणि अभिमान व्यक्त करत असल्याचा अनुभव त्यांनी सामायिक केला. यामुळे जगभरातल्या तमिळ समाजातही याबद्दल विशेष उत्साह असल्याचं ते म्हणाले. या निमित्ताने या परत मिळालेल्या ताम्रपटांविषयी सविस्तर माहिती दिली. केंद्र सरकार देशाच्या अशा अमूल्य वारशांचं जतन संवर्धन करण्यासाठी सातत्यानं प्रयत्न करत असल्याचं ते म्हणाले.

क्रीडा क्षेत्रातल्या देशाच्या उल्लेखनीय यशाबद्दलही त्यांनी सांगितलं. अलिकडेच झारखंडमध्ये रांची इथं झालेल्या वरीष्ठ गटाच्या राष्ट्रीय ॲथलॅटिक्स महासंघाच्या स्पर्धेत देशभरातून जवळपास आठशे खेळाडू सहभागी झाले. या स्पर्धेत चार वेगवेगळ्या क्रीडाप्रकारांमध्ये चार राष्ट्रीय विक्रम मोडीत निघाले अशी माहिती त्यांनी दिली. या स्पर्धेत वेगवेगळ्या क्रीडा प्रकारांमध्ये नवे विक्रम रचलेल्या गुरिंदरवीर सिंह, विशाल टीके, तेजस्विन शंकर, देव मीणा आणि कुलदीप कुमार या सर्व खेळाडूंचं त्यांनी  अभिनंदन केलं. अवघ्या दोन दिवसांत पुरुषांच्या शंभर मीटर धावण्याच्या शर्यतीचा राष्ट्रीय विक्रम तीन वेळा मोडीत निघाल्याचा उल्लेखही त्यांनी केला. ही कामगिरी केलेल्या गुरिंदरवीर सिंह आणि अनिमेष कुजूर या दोन्ही खेळाडूंचं कौतुक करत त्यांच्याशी प्रधानमंत्र्यांनी थेट संवादही साधला.

भारतीयांच्या खगोलशास्त्राच्या आवडीबद्दल प्रधानमंत्र्यांनी आजच्या मन की बातमध्ये चर्चा केली. या निमित्तानं आपल्या वेधशाळांचे महत्त्व त्यांनी सांगितलं. देशभरात खगोलशास्त्राला लोकप्रिय करण्यासाठी केल्या जात असलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी दिली. आपला छंद जोपासण्यासाठी वेळ काढणं आणि सतत काहीतरी नवीन शिकणं अत्यंत महत्त्वाचं आहे असं ते म्हणाले.

नमामि गंगे अभियान अंतर्गतच्या डॉल्फिन बचाव रुग्णवाहिका या उपक्रमाची आणि डॉल्फिनच्या संरक्षणात होत असलेल्या त्याच्या उपयोगाविषयी देखील त्यांनी सांगितलं. याच संदर्भानं उत्तरप्रदेशात गंगा नदीत एका डॉल्फिनला वाचल्याच्या घटनेबद्दल त्यांनी श्रोत्यांना सांगितलं. जेव्हा आपण गंगा डॉल्फिनला वाचवतो, तेव्हा आपण केवळ एक प्रजातीच वाचवत

नाही, तर आपण गंगेची जैवविविधता वाचवतो. नदीतलं संपूर्ण जीवनचक्र वाचवण्यासोबतच आपल्या भावी पिढ्यांसाठी निसर्गाचा एक अमूल्य वारसाही वाचवतो असं ते म्हणाले.

लोकांची सेवा करण्यासाठी प्रचंड संसाधनांची गरज नसते, तर त्यासाठी फक्त एक चांगला हेतू आणि सातत्यपूर्ण प्रयत्न पुरेसं असतं असा मोलाचा सल्लाही त्यांनी श्रोत्यांना दिला. देशातल्या प्रत्येक गावात आणि शहरात आपल्याला प्रेरणा देणाऱ्या असंख्य गोष्टी घडत आहेत. अनेकदा या प्रयत्नांची फारशी चर्चा होत नाही, पण जेव्हा आपल्याला त्यांची जाणीव होते, तेव्हा आपला देश आपल्या लोकांच्या सामर्थ्यानं पुढे वाटचाल करत असल्याचा आपला विश्वास अधिक दृढ होतो असं ते म्हणाले. नागरिकांनी आपल्या आसपासच्या अशा प्रयत्नांचा शोध घ्यावा, जे समाजासाठी चांगले काम करत आहेत त्यांची दखल घ्यावी - त्यांचं कौतुक करावं, त्यांच्याकडून शिकालं आणि शक्य असल्यास अशा काही चांगल्या कामात सहभागी व्हावं असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

जनरल एन.एस. राजा सुब्रमणी यांनी आज देशाचे नवीन संरक्षण दल प्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. नवी दिल्लीत साऊथ ब्लॉक प्रांगणात त्यांना मानवंदना देण्यात आली. पाकिस्तान आणि चीनविषयक तज्ज्ञ, अशी ओळख असलेले जनरल सुब्रमणी, यापूर्वी राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयात लष्करी सल्लागार म्हणून कार्यरत होते. आपल्या ४० वर्षांपेक्षा जास्त मोठ्या कारकिर्दीत, जनरल सुब्रमणी यांनी विविध प्रकारच्या संघर्षमय परिस्थितीत आणि भौगोलिक प्रदेशात सेवा बजावली, आणि भारतीय लष्करामध्ये महत्वाच्या पदांवर काम केलं.

**<><><><><>**

ॲडमिरल कृष्णा स्वामिनाथन यांनी आज देशाचे २७ वे नौदल प्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी यांच्याकडून त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांना संबोधित केलं.

देशाचं हित जपण्याप्रति, भारतीय नौदल सदैव सतर्क असून, प्रादेशिक सुरक्षेबाबत सध्याच्या आव्हानात्मक, जटिल, अनपेक्षित आणि अनिश्चित वातावरणात नौदल सक्रियपणे तैनात असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

भारतीय नौदल क्षमता विकास आणि आधुनिकीकरणाच्या मार्गावर असून, देशाची सुरक्षा आणि आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी आपली युद्धसज्जता सर्वोच्च पातळीवर ठेवण्याला प्राधान्य देत असल्याचं ते म्हणाले.

<><><><>

परदेशी गुंतवणूकदारांनी मे महिन्यात भारतीय बाजारपेठेतून सुमारे ३२ हजार ९६३ कोटी रुपये काढून घेतले. त्यामुळे चालू वर्षात बाहेर पडलेल्या परदेशी गुंतवणुकीचीआतापर्यंतची रक्कम सुमारे सव्वा दोन लाख कोटी रुपये झाली आहे. गेल्या वर्षी म्हणजे २०२५मधे परदेशी गुंतवणूकदारांनी एक लाख ६६ हजार कोटी रुपये काढून घेतले होते. गेल्या फेब्रुवारीत २२ हजार ६१५ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक भारतात आली, मात्र मार्चमधे पुन्हा एक लाख १७ हजार कोटी रुपयांचा ओघ बाहेर झाला.

<><><><>

इराण बरोबर अणुकराराच्या वाटाघाटी अंतिम टप्प्यात आहेत, मात्र त्या निष्फळ ठरल्या, तर लष्करी कारवाईचा पर्याय अजूनही खुला असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. ते काल व्हाईट हाऊसमध्ये एका वृत्तवाहिनीला मुलाखत देत होते. इराण अण्वस्त्रसज्ज होणार नाही, याची खात्री करणं, हेच आपल्या प्रशासनाचं सर्वोच्च प्राधान्य असल्याचं ते यावेळी म्हणाले. या वाटाघाटी यशस्वी झाल्या, तर होर्मूझची सामुद्रधुनी त्वरित खुली होऊ शकते, मात्र आपल्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत, तर इराण विरोधातली कारवाई सुरूच राहील, असा इशारा त्यांनी दिला.

अमेरिका आणि इस्राएलनं इराण विरोधात युद्ध छेडल्यामुळे गेले काही महिने पश्चिम आशियात निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिका आणि इराणमध्ये या वाटाघाटी सुरु आहेत.

<><><><>

तंबाखूच्या सेवनापासून असलेल्या धोक्यांविषयी जागृती निर्माण करण्यासाठी आज ‘जागतिक तंबाखू विरोधी दिवस’ पाळला जात आहे. तंबाखू सेवन पूर्णपणे थांबवण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेनं हाती घेतलेला हा जागतिक कार्यक्रम आहे. ‘आकर्षणाचा मुखवटा उतरवू- निकोटीन आणि तंबाखूच्या व्यसनावर मात करू’, ही यंदाच्या या दिवसाची संकल्पना आहे.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

३१ मे २०२६ -रवि वार

<><><><><>

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या  त्रिशतकोत्तर पहिल्या जयंतीनिमित्त त्यांना आज सर्वत्र अभिवादन करण्यात येत आहे.  पुण्यश्लेक अहिल्याबाई म्हणजे मूर्तीमंत सुशासन, देशभक्ती आणि सांस्कृतिक अस्मितेचं प्रतीक होत्या, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एक्स समाजमाध्यमावर म्हटलंय. देशभरात विविध ठिकाणी अहिल्याबाईंच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम होत आहेत. अहिल्याबाईंचं जन्मस्थान, महाराष्ट्रात अहिल्यानगर जिल्ह्यातल्या चोंडी इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत अभिवादन सभेचं आयोजन करण्यात आलं आहे. मुंबईत चर्चगेट स्थानकाजवळच्या अहिल्यादेवींच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली.

<><><><><>

काँगो आणि युगांडामध्ये इबोला आजाराचा प्रादुर्भाव झाल्याच्या पार्श्वभूमीवर या प्रदेशात प्रवास बंदी सीमा बंदी लागू करणाऱ्या देशांनी या उपाययोजनांचा  पुनर्विचार करावा, असं आवाहन जागतिक आरोग्य संघटनेचे महासंचालक टेड्रोस गेब्रेयसस यांनी केलं आहे. यामुळे या प्रदेशातल्या मदतकार्यात अडथळा येऊ शकतो, असं त्यांनी म्हटलं आहे.  या साथीच्या आजाराचं केंद्र असलेल्या, पूर्व काँगोमधल्या  'बूनिया' इथं भेट दिल्यावर ते बोलत होते.

<><><><><>

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि गुजरात टायटन्स यांच्यात अंतिम लढत होणार आहे. गुजरातमध्ये अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडिअमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

<><><><><>

भारताची महिला कुस्तीपटू विनेश फोगाट हिचा काल आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी झालेल्या निवड चाचणी स्पर्धेच्या ५३ किलो वजनी गटातील उपांत्य फेरीत मीनाक्षी गोयत हिच्याकडून पराभव झाला. मीनाक्षीनं विनेश हिला ४ - ६ असं नमवलं.

//<><><><><>//